म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. २६५




REFBK-0011396



सन १९६०

# 'उदयोऽस्तु अंबे!'

## अम्बानगरी अमरावती

अपर्णे शर्वाणि त्रिनयनगृहस्वामिनी उमे ।
कृपापांगे तुझ्या प्रणतजनचिंतानल शमे ।
मृदुस्वांते, शांते, जननि जगदंबे भगवती ।
करावें त्वा ऐसें शुभअशुभकर्मे जुगवती ॥

शकुन्तला दिवाणजी

किंमत
६५
नये पैसे

REFBK-0011396

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

श्री : २४२

© १ ९ ६ ०
वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रा. लि. मुंबई २.

*

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शनमाला : २८
...विदर्भ परिसर

*

आवृत्ति पहिली : १९६०

*

किंमत ६५ नये पैसे

*

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य बोलकीं शब्दचित्रें

*

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अँण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २.

*

मुद्रक :
ज. ग. जोशी,
जनार्दन प्रेस,
३९४ सदाशिव, पुणें २.

# विदर्भाचें संस्कृति-वैभव

महाराष्ट्राच्या घटकप्रदेशांतील विदर्भ-भूमि अत्यंत प्राचीन आहे. उपनिषत्कालापासून विदर्भाचे गौरवोल्लेख आढळतात. नर्मदा आणि कृष्णा या नद्यांच्या मधल्या प्रदेशांत विदर्भानें प्राचीन काळीं आपला सांस्कृतिक प्रभाव पाडला होता. महर्षि अगस्त्यांच्या तपस्तेजानें उजळून निघालेली लोपामुद्रा, भगवान् श्रीकृष्णाचें हृदय जिंकणारी रुक्मिणी आणि पुण्यश्लोक नलराजासाठीं वनवास पत्करणारी दमयन्ती या विदर्भभूमीच्याच कन्या.

इतिहास-काळांत सातवाहन, वाकाटक, कलचूरी, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव या सर्व प्रसिद्ध राजकुलांनीं विदर्भाची गौरवशाली परंपरा वर्धिष्णु बनविली. वाकाटकांच्या काळांत तर विदर्भभूमि संस्कृति-वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होती. गुप्तवाकाटकांनीं भारतीय इतिहासाचें सुवर्णयुग घडविलें—त्या वाकाटकांची राजधानी विदर्भांत नंदिवर्धन (नगरधन) येथें होती. राज्यकर्तृत्व, धर्म, साहित्य आणि कला या संस्कृतीच्या सव अंगाचें विदर्भानें पोषण केलें आहे.

‘ वैदर्भी रीति ’ विदर्भाच्या मातींतूनच फुललेली आहे. महाकवि भवभूति हा विदर्भाचाच पुत्र. महानुभावपंथसंस्थापक चक्रधरांचे गुरु गुंडम राऊळ, आदिकवि मुकुंदराज, द्वितीय दत्तावतार श्रीनरसिंह सरस्वती हे मूळचे विदर्भांतीलच.

—श्रीरामाच्या पाऊलखुणा उरीं सांठविणारें रामटेक, रुक्मिणी-स्वयंवराच्या मधुर स्मृतींत रंगणारी अमरावती, जैनांच्या परंपरेची जपणूक करणारा मुक्तागिरि, महाकालीची उपासना करणारें चंद्रपूर, श्रीगणेशाच्या आराधनेंत मग्न असणारीं आधाशा आणि कळंब हीं स्थानें, विदर्भपंढरी कौंडिण्यपूर आणि आधुनिक सन्त श्रीगजाननमहाराज यांचें शेगांव या विदर्भांतील कांहीं संस्कृतिकेंद्रांचा परिचय या मालेंतून करून दिला जात आहे.

अनुक्रम
क्रमांक
द्रा. क्र.

# ‘उदयोऽस्तु अंबे!’

## अमरावती

“हे महालक्ष्मी, महासरस्वती दुर्गे! हे जगदंबे! माझ्या कडून घडलेल्या अपराधाची मला क्षमा कर. तुझ्या कृपेनें मला व माझ्या कुटुंबाला दीर्घायुष्य आणि सुख मिळावें, ह्याकरिता मीं तुझी पूजा करतों. तूं प्रसन्न होऊन माझी इच्छा पूर्ण कर.”

आश्विन शुद्धपक्षीं प्रतीपदेला अंबादेवी सिंहासनारूढ झाली कीं भक्तगण अनन्यभावें तिची प्रार्थना करतो. श्रद्धायुक्त अंतःकरणानें “उदयोऽस्तु अंबे!” हें मागणें मागून अंबेच्या पदकमलीं विलीन होतो.

रत्नजडित सिंहासन दंड मोरचल छत्रचामरें हो ।
कटकमुकुट कुंडलें मौक्तिक माणिक मणि नक्षत्रें हो ॥



स्वयंभु अम्बादेवी

असें हें हे सकलभूषणालंकृत अंबादेवीचें ध्यान पाहून दर्शनोत्सुक भाविकांच्या नेत्रांचें पारणें फिटतें.

मुंबई नागपूर रेल्वेलाईनवरील बडनेरा जंक्शनला उतरलें कीं बडनेऱ्याच्या दक्षिणेस बडनेरा-अमरावती ही एक स्वतंत्र रेल्वेलाइन आहे. ह्या दोन स्टेशनांतील अंतर फक्त सहा मैलांचें आहे. ह्या अमरावती शहराचें माहात्म्य अमरावतीवासिनी अंबेच्या देवालयामुळें अधिक वाढलेलें आहे. परप्रांतीयांनीं अमरावती शहरांतील प्रेक्षणीय स्थळांची माहिती मागितल्यास अमरावतीकर त्या यादींत अंबादेवीचें देवालय हें प्रथम क्रमांकाचें मांडतील.

साक्षात् लक्ष्मीचें, रेणुकेचें हें स्वयंभू स्थान आहे. विदर्भांत जीं कांहीं थोडींबहुत स्वयंभू देवतांचीं मंदिरें आहेत, त्या साऱ्या मंदिरांत अंबिकेचें हें देवालय सर्वांत प्राचीन आहे. जागृत देवतेचें एक स्थान म्हणून, श्रद्धावान् भक्तगणांचें आशास्थान आणि पूजास्थान असलेलें हें अंबिकेचें मंदिर आहे; आणि म्हणूनच सुसंपन्न वैभवशाली अशा अमरावती शहरांतील भाविकांनाच नव्हे, तर दूरदूरच्या यात्रींना हें अंबिकेचें देवस्थान तीर्थक्षेत्राप्रमाणें पापाचें क्षालन करणारें व पुण्यसंचयाचें निधान म्हणून पावनतीर्थ वाटतें.

## अंबादेवीचा वास्तव्यकाल :

अमरावतीवासिनी अंबादेवी ही स्वयंभू आहे; आणि हिचें या प्रदेशांतील वास्तव्य फार फार प्राचीन कालापासूनचें आहे असें साधार सिद्ध झालेलें आहे.

ह्या स्वयंभू अंबादेवीचा परिचय करून घ्यायला आपल्याला ५००० वर्षांपूर्वींच्या महाभारतकालाला भेट द्यावी लागेल. भीमक-राजकन्या रुक्मिणी ही स्वयंवराआधीं याच देवीच्या दर्शनाला आली होती. आणि ह्या देवालयांतून श्रीकृष्णानें रुक्मिणीचें हरण केलें अशी साधार माहिती मिळते. संतश्रेष्ठ संतकवि एकनाथ महाराज व सामराज इत्यादि श्रेष्ठ कवि ह्यांनीं रुक्मिणीस्वयंवराचें मोठें रसाळ वर्णन केलें आहे.

> विदर्भीं हे आहे प्रथित वहुधा कुंडिनपुरी ।
> तयेच्या राजाची चतुर विलसे आजि कुमरी ॥

अमरावती शहराच्या पूर्वदिशेला वर्धानदीशेजारीं चौदा कोसावर कौंडण्यपूर नांवाचें एक खेडें आहे. विदर्भराजाची राजधानी म्हणून महाभारतांत ज्या कुंडिनपुराचा उल्लेख आहे तेंच सध्याचें कौंडण्यपूर होय. या कुंडिनपूरच्या भीमक राजाची रुक्मिणी ही कन्या होती. रुक्मिणीचा भाऊ रुक्मी, ह्याचा मित्र शिशुपाल हा चैद्य देशाचा राजा होता. रुक्मीनें आपल्या भगिनीचा विवाह आपल्या मित्राशीं निश्चित केला होता. भीमकाची सुंदर चतुर कन्यका रुक्मिणी ही ह्या लग्नाला राजी नव्हती. तिनें आपल्या मनोमनीं दुसरा वर योजला होता. आणि म्हणूनच ती देव-देवतांच्या दर्शनास जाऊन——

प्रार्थी भीमकनृप-बाळा ।
दाखवी जननी गोपाळा ॥

अंबादेवीपाशीं तर हेंच मागणें ती सतत मागे. एवढेंच नव्हे तर रुक्मिणीनें सुदेव ब्राह्मणाजवळ पत्र देऊन त्याला श्रीकृष्णाच्या द्वारकेला पाठविलें. त्या पत्रांत तिनें विवाहासंबंधीं मनीषा व्यक्त केली.

इकडे रुक्मिणीच्या लग्नाचा मुहूर्त जवळ येऊन ठेपला. राजघराण्यांतील चालीरीतीप्रमाणें रुक्मिणी आपल्या आईच्या इच्छेनुसार अंबिकादेवीच्या दर्शनास जायला सिद्ध झाली.

रुक्मीचा या विधीस विरोध होता. पण कुलाचार आणि कुलदैवत यांचें महत्त्व स्त्रियांना केव्हांहि अधिकच वाटतें. रुक्मीनें विरोध करतांच राजा भीमक स्वस्थ बसलेला पाहून रुक्मिणीच्या आईनें स्पष्ट शब्दांत सांगितलें :

शुद्धमती म्हणे रायाची ।
तुम्ही विसरलांती कुलधर्मासी ।
कन्या न्यावी अंबिकेसी ।
गौरीहरासी पूजावया ॥

आणि मग भीमक राजानेंहि फारसा विरोध न करतां रुक्मिणीला अंबादेवीच्या दर्शनाला पाठविलें. ही अंबिका, ह्या अंबिकेचें देवालय कुठें होतें ?

ग्रामास सन्निध निकेतन अंबिकेचें ।
जें हें असे निजमनोरथ दायिकेचें ॥

ह्याच अंबादेवीच्या देवालयांत रुक्मिणी गौरीहरपूजनास गेली.

हातीं नीलोत्पलाची माला ।
ते घातली जगदंबेच्या गळा ।
वर देई वो घन सावळा ।
उचितकाळा आजिच्या ॥

अशी तिनें अंबिकेची प्रार्थना आरंभिली.

सत्य-शिव-सुंदराची अधिष्ठात्री देवता अंबिका हिनें रुक्मिणीचें गाऱ्हाणें ऐकलें. ह्या "अंबालयीं" यादववीर उतरले होते. आणि ह्या ठिकाणाहूनच श्रीकृष्णानें रुक्मिणीचें हरण केलें. अजूनहि येथील पूजारी ही कथा मोठ्या भक्तिभावानें सांगतात. एवढेंच नव्हे तर रुक्मिणीने पद्मायनस्थित अंबिकेच्या चरणावर मस्तक ठेऊन आण घातली होती. ती खूण अजूनहि अंबेच्या पदकमलावर उमटलेली आहे असें भाविक मानतात.

भाविकतेच्या मायाजाळांतून बाहेर पडून आपल्याला बुद्धिपुरस्सर असा ह्या अंबिकेच्या वास्तव्याचा विचार करावयाचा आहे.

ही कथा पुराणांतील आहे म्हणून अगदींच असत्य असें म्हणणें जरा धाष्टर्याचें होईल. परन्तु ह्या कथेवर विश्वास ठेवतांना ज्या एकदोन शंका निर्माण होतात, त्याचें निरसन करतां आल्यास बघूं या.

“ कुंडिनपूर ” म्हणजे आजचे कौंडण्यपूर. हें खेडें सध्यां अमरावतीच्या पूर्वेस चौदा कोसांवर आहे हें वर वर्णिलेंच आहे. “ ग्रामास सन्निध ” या शब्दानें वर्णिलेलें हें अंबिकेचें देवालय तेंच हें रुक्मिणीचें गौरीहरपूजनप्रसंगीं उल्लेखिलेलें मंदिर असूं शकेल का ? अशी शंका, दोन स्थळांतील सध्याचें अंतर अजमावतां, निर्माण होते. आणि हें स्वाभाविक आहे.

पण ह्या शंकेचें निरसन विचारान्तीं सहज होऊं शकतें. सध्याचें लहानसें खेडें असलेलें कौंडण्यपूर ५००० वर्षांपूर्वी विदर्भ देशाच्या भीमक राजाचें राजधानीचें शहर होतें. त्यावेळीं प्रसिद्धी पावलेली कुंडिनपूर नगरी, तिचा विस्तारहि तितकाच मोठा असेल. शिवाय विदर्भदेशच्या राजाजवळ असणारें सैन्य आणि सरंजाम, त्यांनीं व्यापलेला भूमिभाग, त्यावेळेस वायुवेगानें धावणारीं रथादि वाहनें, या साऱ्याचा विचार केल्यास चौदा कोसांच्या अंतरावर असलेलें अंबिकेचें देवालय “सन्निध” या शब्दांत बसूं शकतें. याशिवाय रुक्मी रागावून गेल्यानन्तर भोजकटला राजधानी करून तो तेथेंच राहिला, असा उल्लेख आहे. सध्यांचें अमरावती तालुक्यांतील हें स्थान म्हणजे

भातुकली नांवाचें खेडें आहे. अमरावतीहून दक्षिणेस सतरा मैलावर असलेलें वलगांव या ठिकाणीं बलरामाचें सैन्य उतरलें होतें, तेव्हां ह्या साऱ्या सैन्यविस्ताराचा आणि साधनांचा विचार केल्यास, ही अंबिका म्हणजे सध्यांची अमरावतीवासिनी अंबादेवी, हीच रुक्मिणीची आराध्यदेवता आहे, हें निश्चित पटूं लागतें.

या अंबालयांत श्रीकृष्णासहित यादववीर उतरले होते. या वऱ्हाडी मंडळींना रहातां येईल, असें हें अंबालय आतांपेक्षां कितीतरी पटीनें अधिक भव्य स्वरूपाचें असेल ह्यांत शंका नाहीं. राजाचें कुलदैवत असलेली ही अंबिका, हिचा थाट काय विचारायला हवा ! राजाश्रयी मंडळींना जिथें कसली न्यूनता भासत नव्हती, तिथें, जी कुलस्वामिनी आहे त्या अंबिकेच्या वैभवाला कसली वाण असणार ! त्या काळीं अंबादेवी अधिक वैभवसंपदेची स्वामिनी असावी हें अनुमान काढायला कांहींच प्रत्यवाय नाहीं.

अंबादेवीच्या आसपासच्या वस्तीला त्याकाळीं अंबिकापूर म्हणून संबोधीत असत, असा उल्लेख आढळतो. हेंच आजचें अमरावती. या भागांत औदुंबर वा उम्बर या वृक्षांची विपुलता अधिक असल्यानें ह्या वस्तीला उम्बरमन्ती हें नांव दिलें गेलें. उम्बरमन्ती, उमरावती व सध्याचें अमरावती, असा ह्या शहराच्या नांवांत बदल होत गेला.

असें हें आजच्या अमरावतीच्या अंबादेवीचें, पुराण-कालाला परिचित असें रूप आहे. हा पुराणकाळांतील स्मृतिरूप सुगंध आजहि भाविकांच्या मनोरूप वातावरणांत दरवळतो आहे. त्या सुगंधानें तल्लीन झालेल्या भाविकांच्या मनोवृत्ति,

या स्वयंभू देवतेला, या चिन्मयमूर्तीला अभिवादन करून विनवितात :

“ उदयोऽस्तु अंबे ! उदयोऽस्तु अंबे ! ”

**अंबादेवीचें अस्तित्व :**

महाभारतकाळ हा प्राचीन युगांतील सुधारणेच्या कळसाचा काळ होता.

“ पूर्णोत्थापन काळ तोच पतनप्रारंभहि होतसे । ” या उक्तिप्रमाणें सुधारणेच्या कळसाचा काळ, त्याला आतां उतरती कळा येऊं लागली होती. भारताचा मधला इतिहास लुप्तप्राय आहे. महाभारतकाळांतील वैभवाच्या शिखरीं विराजमान असलेली ही अमरावतीवासिनी अंबादेवी, मधल्या काळांत दुर्लक्षिली गेली असेल. अमरावतीची अंबादेवी या काळांत कुठेंहि उल्लेखिली गेली नाहीं; हिचें अस्तित्व नाममात्र असावें. विदर्भाच्या इतिहासांत अंबादेवीसंबंधीं उल्लेख आहे, पण तो फार त्रोटक आणि अल्पस्वल्प आहे.

एक गोष्ट मात्र निश्चित आहे, आणि ती ही कीं अनेकधर्मीयांची राजसत्ता या काळांत अमलांत आली असेल, परंतु या स्वयंभू स्थानाला धक्का लावण्याचा विचार कोणाच्याहि मनांत उद्‌भवला नाहीं. एवढें मात्र खरें कीं महाभारतकालीं भव्यदिव्य स्वरूपाचें असलेलें हें अंबालय काळाच्या ओघांत पडीझडीला बळी पडलें असेल. त्या देवालयाचें पूर्वीचें वैभव सतत जसेंच्या तसें टिकणें अशक्य होतें. तें बौद्धकाळांत दुर्लक्षिलें गेलें असेल, हिंदुधर्मीयांनीं पुनः त्याला सावरलें असेल, एवढेंच अनुमान काढतां येतें.

महाभारतकाळानन्तर नानाधर्मीयांच्या सत्ता आल्या नि गेल्या, परंतु अंबादेवीच्या स्वयंभू स्थानाचें अस्तित्व टिकून राहिलें ही मोठ्या सुदैवाची गोष्ट म्हणतां येईल.


## अंबादेवी आणि एकवीरादेवी:

अंबादेवीच्या परिसरांत असलेल्या वस्तीला अंबिकापूर हें नांव होतें. हें शहर अंबाल्याच्या पश्चिम दिशेला होतें. अंबाल्याचा आसपासचा प्रदेश अरण्यानें व्यापलेला होता. अंबादेवीच्या दक्षिण दिशेला पन्नास गजांवरून एक नाला वाहतो. तो सध्यां अंबानाला या नांवानें परिचित आहे.

सातशें वर्षांपूर्वी हा नाला नदीच्या विस्तारानें वहात होता. ह्या अंबानाल्यापलीकडील अरण्यांत एक देवीचा भक्त होता. तो भक्त जनार्दनस्वामी या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्यांच्यासंबंधीं अनेक आख्यायिका प्रसृत आहेत. अंबादेवीचा हा परमभक्त सदा व्रतस्थ असे. दररोज अंबादेवीचें दर्शन घेतल्यावांचून अन्नपाणी न घेण्याचा ह्या भक्ताचा नेमधर्म होता. एक दिवस पावसाळ्यांत ह्या अंबानदीला भयंकर पूर आला. दोन-तीन दिवस भक्ताच्या नियमांत खंड पडला, अन् त्यानें अन्नपाणीहि वर्ज्य केलें. अंबादेवीनें दृष्टांत देऊन "माझ्या अंशाचीच तुझ्या वस्तीला प्रतिष्ठापना कर" अशी आज्ञा केली. दृष्टांताप्रमाणें तेथील विहिरींत देवीची मूर्ति सांपडली. अंबादेवीचा अंश म्हणून त्या देवीची भक्तानें प्रतिष्ठापना केली. आणि—

**जनार्दना पावली कृपेची साउलि ।**

ही प्रतिष्ठापना झालेली देवी एकवीरादेवी म्हणून प्रसिद्धीस आली. अंबादेवीचा अंश म्हणून एकवीरादेवीची षोडषोपचारें पूजाअर्चा होऊं लागली. जनार्दनस्वामींच्या शिष्यांनीं तेथें देवालय बांधलें. आणि तेव्हांपासून अंबादेवीचें दर्शन घेणारी मंडळी तशीच न परततां या एकवीरादेवीचें दर्शन घेऊनच परत फिरतात.



एकवीरादेवी

जनार्दनस्वामींच्या शिष्यांनीं दोन्ही देवतांचें दर्शन घडावें म्हणून मधोमध नाल्यावर एक पूल बांधला. आज हा पूल चांगला भरभक्कम मजबूत असा बांधलेला आहे.

एकवीरादेवीच्या देवालयाच्या रचनेवरून हें देवालय यवनकाळांत बांधलें गेलें असावें असें अनुमान काढतां येतें. परकीयांपासून संरक्षण व्हावें ह्या हेतूनें ज्या कांहीं इमारती बांधल्या गेल्या त्याच पद्धतीनें एकवीरादेवीचें देऊळ बांधलेलें दिसतें. ह्या एकवीरादेवीला 'मोठी देवी' म्हणून संबोधतात. भक्ताला मोठेपणा देऊन ह्या देवीची प्रतिष्ठापना झाली आहे म्हणून ही देवी मोठी अशी लोक कारणमीमांसा करतात.

**अमरावतीवासिनी अंबादेवी :**


मध्यकाळांत अमरावतीचें व अनुषंगानें अंबादेवीचें अस्तित्व लुप्तप्राय असलें, तरी पण अठराव्या शतकाच्या मध्यकाळापासून

नागपूरचे रघुजी भोसले यांनीं वऱ्हाड आपल्या ताब्यांत घेतांच अमरावतीच्या उर्जितकाळास सुरुवात झाली आणि अवशेषरूप अवस्थेंत असलेलें, प्राचीन संस्कृतीचें स्मारक म्हणून स्वयंभू अंबादेवीकडे विशेष लक्ष पुरविण्यांत आलें.

आजची अंबादेवी ही अमरावतीच्या तटाबाहेरील देवी हें सर्वश्रुत आहे. सध्यांचें अंबादेवी संस्थान हें एक अमरावती शहरांतील मध्यवर्ती स्थान आहे. साधारणतः दीडशें वर्षांपूर्वी अमरावती शहर हें मागें वर्णिल्याप्रमाणें उम्बरमन्ती नांवानें परिचित होतें. जुन्या अमरावतींत कांहीं विशिष्ट भागाला कासार ओळ, सराफा लाईन, सक्करबाजार हीं नांवें आहेत. ह्या विशेष नांवावरून त्या काळीं अमरावती हें एक अतिशय समृद्ध आणि व्यापारी शहर असावें असें अनुमान काढता येतें. परप्रान्तीयांपासून संरक्षण व्हावें म्हणून आणि पेंढारी लोकांपासून मालमत्तेचा बचाव व्हावा याकरितां ह्या जुन्या अमरावतीला एक तट बांधला. ही भिंत ओबडधोबड आहे परन्तु अतिशय मजबूत आहे. ह्या भिंतीची उंची साधारणतः २६ फूट आहे.

ह्या तटाच्या पूर्वभागीं एक दरवाजा आहे. अंबादेवीच्या देवालयापासून शंभर गजांवर असलेल्या ह्या वेशीला अंबादरवाजा हें नांव आहे.

ह्या अंबादरवाजाच्या पूर्वेकडील भाग नवीन वस्तीनें व्यापलेला आहे. सध्यांच्या नवीन वस्तींत अंबादेवीचें देऊळ आहे. आज ह्या भागांत वस्ती असली तरी ९० वर्षांपूर्वी येथें रेल्वे स्टेशन बांधलें गेलें त्यावेळीं हा सर्व भाग जंगलमय होता.



अंबा-दरवाजा

१८९३ सालीं ह्या भागांत पहिला वाडा बांधला तो वऱ्हाडचे नबाब म्हणून प्रसिद्धीला आलेले कै. दादासाहेब खापर्डे यांनीं. तदनन्तर येथें हळूहळू वस्ती होऊं लागली. ह्या काळापर्यंन्त येथील अंबादेवीचा परिसर व्याघ्रसिंहादि वन्यपशूंनीं गजबजलेला होता.

आतां आपण अंबादरवाजांतून बाहेर पडूं या. पूर्वभागाला ३० ते ४० गज चालून गेल्यानन्तर उजव्या बाजूस एक महाद्वार दृष्टिपथांत येतें. ह्या महाद्वारांतून आंत शिरूं या. उजव्या बाजूस दृष्टि फेकतांच एक बालाजीचें सुंदर देऊळ नजरेंत भरतें. तें भव्य व सुंदर मंदिर आणि त्यांतील प्रतिष्ठित अशी भूषणालंकृत बालाजीची गोड मूर्ति पाहून मन स्थिरावतें. बालाजीच्या मूर्तीवरील नजर खालीं वळवावी तों तेथें सर्व देवदेवतांचें संमेलन आढळतें. राधाकृष्ण, रामलक्ष्मण आणि सीतामाई,

जगदंबा, शिव-पार्वती आदि सर्व देवदेवता एकत्र पाहून ईश्वराच्या एकत्वाविषयींची भावना दृढावते आणि मनाला अवर्णनीय शांतीचा, प्रसन्नतेचा प्रत्यय येतो.

देवालयाच्या बाहेरील वातावरण अति शांत आणि सोज्वल अशा स्वरूपाचें आहे. देवालयाच्या आसपासचा भूमि-भाग भक्तांच्या समाध्यांनीं आणि त्यावर चवऱ्याप्रमाणें हल-णाऱ्या वृक्षलतांनीं व्यापलेला आहे.


आतां आपण महाद्वाराच्या डाव्या हाताला वळूं या. त्या भागाला कासाराचीं दुकानें मोठ्या आकर्षक पद्धतीनें थाटलेलीं दिसतील.

सौभाग्य अलंकार म्हणून सौभाग्यवतींना बांगड्यांचें महत्त्व विशेष, तर नटण्याथटण्यासाठीं अद्यावत् वेषभूषा सज-विणाऱ्या तरुणींना ह्या विविधरंगी बांगड्यांचें विशेष आकर्षण. ह्या जुन्या-नव्यांची हौस भागविण्यासाठीं सारीं दुकानें सज्ज असतात. आणि त्यामुळेंच इथें केव्हांहि पहा महिलांची रीघ लागलेली असते.

अंबादेवीच्या देवालयांत जाऊन पोहोंचण्यापूर्वी नाना तऱ्हेच्या आकर्षक वस्तुभांडारांनीं मनाला मोह पडतो. पण अंबेच्या दर्शनाची आंतरिक ओढहि तेवढीच किंबहुना त्यापेक्षां अधिकच जबरदस्त असल्यानें भक्तगण तो मोह क्षणांत दूर सारतो व आपलीं पावलें देवालयाकडे वळवितो.

अंबादेवींच्या दर्शनास जावयाचें तर त्यासाठीं पूजेचें साहित्य हवें. हळदकुंकू, फुलें, फुलांचे हार, नारळ, पेढ्यांच्या पेट्या बाहेरच्या दुकानांत तयार असतात. भाविक प्रथम हें साहित्य खरेदून मगच अंबेच्या दर्शनासाठीं देवालयाच्या पायऱ्या चढतो.

ह्या अंबालयाच्या दर्शनी भागावरून देवालयाच्या प्रशस्ततेची कल्पना सहज येऊं शकतें. देवालयांत पोहोंचण्यापूर्वी आठ दहा पायऱ्या चढून जावें लागतें. देवालयाच्या आंत प्रवेशतांच उजव्या हाताला अंबादेवी संस्थानची कचेरी लागते. अंबादेवीच्या देवळाबाहेरील विस्तृत परिसर दर्शनेच्छु भक्तांनीं गजबजून गेलेला असतो. देवालयाच्या सर्व भिंती महाभारतकालीन चित्रें रेखाटून सुशोभित केल्या आहेत. तीं महाभारतकालीन रेखाचित्रें प्रेक्षकांना त्या काळाचें यथातथ्य दर्शन घडवितात, इतकीं तीं जिवंत अशीं चितारेलेलीं आहेत. गाभाऱ्याच्या दाराशीं एक कठडा आहे. देवीचें दर्शन ह्या दाराबाहेर असलेल्या कठड्याशीं थांबून घेतां येतें. तीर्थ, अंगारा, प्रसाद देण्यासाठीं पूजारी सतत सिद्ध असतो.


अंबा-मंदिराचा दर्शनी भाग


गाभाऱ्याच्या दरवाजांतून देवीचा भव्य तेजस्वी मुखवटा दिसतांच डोळे सुखानें न्हाऊन निघतात. ह्या स्वयंभू अंबादेवीचा मुखवटा काळ्या पाषाणाचा आहे. दर मंगळवारीं अंबिका नाना अलंकारांनीं भूषविली जाते. त्या दिवशीं अंबादेवीचे तेजस्वी भाव विशेषत्वानें प्रकट

झालेले दिसतात. प्रसन्नता व कमनीयता तिच्या मुखकमलावर विराजमान झालेली दिसते. अर्थात् "भाव तैसा देव" याचीहि ही प्रचीति असावी. कोणी सांगावें ?

अंबादेवीची ही वास्तु प्रशस्त आहे. परगांवाहून आलेल्या कथाकीर्तनकारांचें वास्तव्य या देवालयांतच असतें. कीर्तनासाठीं येथें भव्य व सदा सुसज्ज असा सभामंडप आहे. अंबादेवीच्या सभागृहाच्या वरच्या मजल्यावर धर्मचर्चा, पुराणचर्चा इत्यादि-करितां एकत्र जमण्याची सोय आहे. १९३२-३३ सालापर्यन्त ह्या ठिकाणीं संस्कृत पाठशाळा सुरू होती. कितीतरी विद्यार्थी संस्कृताचे पाठ घेऊन पंडित होत व आपल्या ज्ञानाचा लाभ इतरेजनांना देत. मध्यन्तरी कांहीं अपरिहार्य कारणानें ही संस्कृत पाठशाळा बंद पडली. कदाचित् भोंवतालची परिस्थिति विरोधी स्वरूपाची असेल. परन्तु प्राचीन संस्कृतीच्या अध्ययनार्थ भाषाभगिनींची जननी म्हणून गीर्वाण भाषेचें महत्त्व पुनः पूर्ववत् जोमानें सुरू होईल असें वाटतें. महन्मंगल आदि शक्तीच्या पवित्र परिसरांत ह्या भाषेचा विकास होऊन त्यामुळें संस्कृतिसंरक्षण, आस्तिक्य भावनिर्मिति ह्या गोष्टी साधण्यास या पाठशाळेच्या पुनर्निर्मितीची नितांत आवश्यकता आहे.

महालक्ष्मी, महासरस्वति आणि महाकाली यांचा अंशरूप असलेली ही रेणुका अंबादेवी सत्य-शिव-सुंदराची जननी आहे. भाविक ह्या अंबेचें दर्शन घेऊन धनधान्यसमृद्धि, विद्यालाभ, आणि सन्मूल्यांच्या संरक्षणासाठीं प्रार्थना करीत असतो. ह्या अंबादेवीचें दर्शन घेऊन तृप्त होत्साता तो भाविक रेणुकेचा अंशरूप असलेली एकवीरादेवी हिच्या दर्शनार्थ डाव्या हाताच्या दरवाजानें बाहेर पडतो.

एकवीरादेवीच्या दर्शनार्थं जातांना मागें वर्णिलेला अंबानाल्याचा पूल ओलांडावा लागतो. पुलावरून जातांना प्रथम




एकवीरादेवीचें देवालय

भाविक डाव्या हाताला असलेल्या रामाच्या मंदिराशीं जाऊन प्रभू रामचंद्राचें दर्शन घेतो. पूल ओलांडल्यानन्तर भाविकाचा डाव्या हाताला एकवीरादेवीच्या सभामंडपांत प्रवेश होतो. हें एकवीरादेवीचें प्रवेशद्वार कलाकुसरीचा उत्कृष्ट नमुना म्हणून प्रेक्षणीय आहे. कलाकौशल्यानें मंडित अशा ह्या प्रवेशद्वारांतून आंत गेल्यानन्तर सभागृहाच्या भिंतीवर रेखाटलेले पुराण-काळांतील प्रसंग चित्त वेधून घेतात.

अम्बादेवीच्या प्रतिमेपेक्षां ह्या प्रतिमेची स्थापना जरा विशिष्ट पद्धतीची आहे. ह्याचें कारण ह्या एकवीरादेवीची प्रतिष्ठापना यवनकाळीं झालेली असल्यानें कदाचित संरक्षणाची दृष्टि यांत असावी. गाभाऱ्याच्या बाहेर उभ्या राहिलेल्या भक्ताला आपली नजर जरा दूरवर आणि खालच्या भागाला अशी

वळवावी लागते. कारण ह्या देवीची स्थापना थोडीशी खोलगट भागांत केलेली आहे. ह्या एकवीरादेवीचा मुखवटाहि अंबादेवी-प्रमाणेंच भव्य आहे. ह्या एकवीरादेवीच्या विस्तृत पटांगणांत कीर्तनादि कार्यक्रम नित्य संयोजिले जातात. पूर्वी श्री गाडगे-महाराजांचीं कीर्तनें येथें फार गाजलीं होतीं, तीं ह्या देवीच्या परिसरांतच् आयोजिलेलीं जात.

अंबादेवी आणि एकवीरादेवी यांच्या सान्निध्यांत आंतर-राष्ट्रीय कीर्तीची हनुमान व्यायाम शाळेची वास्तु विराजमान आहे.



हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ

एकवीरादेवीच्या दर्शनी भागाला उभे राहिलें असतां पश्चिमेला या व्यायामशाळेंतील विविध असे शारीरिक क्रीडांचे प्रयोग नित्य दृष्टिपथांत येतात. जणुं कांहीं आदिशक्तीच्या प्रेरणेनें दुष्टांचा संहार व दुर्बलांचें संरक्षण करण्याची तालीम या भव्य पटांगणांत होते आहे, असें श्रद्धाशील मनाला वाटूं लागतें.

भावनेचा विचार न करतां वस्तुस्थितीवरूनहि विचारवंत असा कौल देतील कीं या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाची जागतिक कीर्ति आणि उत्तरोत्तर होणारी प्रगति, ह्यामागें ह्या आदिशक्ति अंबादेवीचा वरदहस्त आहे, आशीर्वाद आहे. कारण सत्कार्याला देवतांचें पाठबळ असतेंच असतें असा माझा, व्यक्तिगत कां म्हणा ना, विश्वास आहे.

ह्या एकवीरादेवीच्या सन्निध व हनुमान व्यायामशाळेच्या पटांगणांत मध्यवर्ती भागाला तेजस्विनी भारतमातेची शिल्पकृति आहे. या भारतमातेला साक्षी ठेवून आणि अंबादेवी, एकवीरादेवी यांचा आशीर्वाद घेऊन येथील विद्यार्थी आपली शारीरिक व अनुषंगानें मानसिक बलाची उपासना करीत असतांना दिसतो. येथील पवित्र परिसराचें प्रतिबिंब ठायींठायीं विलसतांना दिसते.

### अंबादेवीची दैनंदिनी :

अरुणोदय होतांच रविकिरणांची प्रभा अंबादेवीच्या कळसावर फाकूं लागते. आणि भूपाळीच्या स्वरूपांत अंबादेवीला जागृत करण्यासाठीं चौघड्याचा नाद देवालयांत व आसमंतांतील प्रदेशांत घुमूं लागतो.

पूजारी स्नानसंध्या आटोपून देवीच्या पूजन-अर्चनेला प्रारंभ करायला अंबादेवीच्या गाभाऱ्यांत प्रवेशतात. वेदपाठाच्या व मंत्राच्या घोषांत महापूजेला सुरुवात होते. पंचामृतानें अंबादेवीला स्नान घालून तिची षोडषोपचारें पूजा करतात. उंची नऊवारी जरीचें लुगडें नेसवून ऋतुविशेष पुष्पांची माला अर्पण करतात. मंत्रघोषानें आणि आरतीनें पूजा निनादते. नंदादीप सतत तेवतच असतो. त्याची वात पुढें सारून, तो स्नेहमय करून

११३५८

पूजारी नैवेद्याच्या तयारीला लागतात. मध्यान्हापूर्वी पुरणपोळी व षड्रसयुक्त भोजनाचा नैवेद्य देवीला अर्पण करतात. तांबूल सेवनार्थ पुढें ठेवतात. तदनन्तर अंबादेवीच्या विश्रान्तिकालाला सुरुवात होते. बारा वाजतां चौघडा पुनः सर्व परिसरांत निनादून उठतो.

रात्रीं साडेनऊ वाजतां आरती व नंतर शेजारती होते. दहाच्या सुमारास अंबादेवीच्या देवालयाचा दरवाजा बंद होतो. पहारेकरी पहारा देत असतात.

दर मंगळवारीं अंबादेवीला सर्व अलंकार चढवितात.

' नवरत्नाचा हार कंठीं ' घातलेली अंबिका 'एकावळीनें' विशेष शोभते. सुवर्णरत्नमौलिक अलंकारानें नखशिखान्त नटलेली अंबिका महाभारतकालीन वैभवाची किंचित् कां होईना साक्ष पटविते. मंगळवार हा अंबादेवीचा दिवस मानला गेल्यामुळें त्या दिवशीं, नवससायास फेडण्यासाठीं, लहान मुलांचें जावळ उतरविण्यासाठीं, सौभाग्यलक्षण म्हणून खणानारळानें ओटी भरण्यासाठीं एकच दाटी होते. मंगळवार म्हणजे अमरावतीला दर सप्ताहांतील एक लहानशा यात्रेचा दिवस वाटतो.

लग्नसमारंभ चालू असतानाची गर्दी तर कांहीं विचारूं नका. गांवांत निमंत्रणाची अक्षत फिरण्यापूर्वी देवीचें दर्शन घेतलें पाहिजे आणि तिला अक्षत पोहोंचवली गेली पाहिजे, अशी प्रथा आहे. नवविवाहित जोडप्यानें देवीला प्रथम येऊन नमस्कार करायला हवा अशी येथें पद्धति आहे. असें आहे ह्या अमरावतीच्या अंबादेवीचें माहात्म्य.

ह्या अम्बादेवीचें माहात्म्य जाणणाऱ्या भक्तांनींच देवीच्या आरत्या तयार केल्या आहेत. त्याच दररोज म्हटल्या जातात. ह्या आरतींतून देवीचें हुबेहूब शब्दचित्र रेखाटलें आहे. अशीच पुढें दिलेली, प्रपंचमुक्तिसाठीं तळमळीनें रचलेली आरती आहे, त्यांत अंबादेवीला स्तुतिसुमनें वाहिलीं आहेत.

**– आरती –**

**अमरावतीवासिनी ।**

**अमरावतीवासिनी मजला पाव तूं निर्वाणीं हो ।**
**अखंड तुजला ध्याती मुनिजन**
**पढतिल वेदपुराणीं हो ॥ धृ० ॥**

**अहो कस्तुरी मळवट शेंदुर रेखिलासे भालीं हो ।**
**नवरत्नाचा हार कंठीं शोभतसे एकावळी हो ।**
**अमरावतीवासिनी ॥ १ ॥**

**अहो नाकीं मुक्ताफळ यानें जडित सुंदर हो ।**
**प्रकाश पडला भासे जैसे गगनीं तुटती तारे हो ॥ २ ॥**

**अहो पायीं तोडर वाक्या लेकुरवाळ तूं गोंधळा हो**
**नादें अंबर गरजे उदो बोलती सकला हो ॥ ३ ॥**

अमरावतीवासिनी अंबादेवीचें वर्णन असणारी अशी ही एकच आरती उपलब्ध आहे.

अम्बादेवीला गोंधळ फार प्रिय आहे. गोंधळ या शब्दावरूनच साधारणतः अर्थ स्पष्ट होतो. आरत्या, स्तुतिस्तोत्रें आणि पोवाडे इत्यादि वाङमय या गोंधळांत समाविष्ट होतें.

लग्नाची वरात सासरीं जाऊन मुलगी आपल्या पतिराजासह मांडव परतणीला माहेरीं येते. आणि त्या रात्रीं माहेरवासिनी व जावईबापूंच्या हस्तें "सत्यअम्बा" पूजिली जाते. गोंधळ्यांना निमंत्रण जातें, गोंधळी येतात. ते कर्दळी उसाचा मांडव तयार करतात. त्या मांडवाखालीं कलशांत अंबादेवीची प्रतिष्ठापना होते. दीपमाळ लावली जाते. पूजा-अर्चा, नैवेद्य होऊन गोंधळी गोंधळाला सुरुवात करण्यापूर्वीं—

**रेणुकेचा जोगवा माता रंगणीं न्याहा।**
**हातीं घ्याहो ज्ञानदिवटी गोंधळ आनंदें पाहा।**

अशी अंबादेवीला प्रार्थना करतात. रात्रभर देवदेवतांचें स्मरण करून, स्तुतिपाठांनीं अंबादेवीला प्रसन्न करतात. ज्या घरांत "गोंधळ" होतो त्या घरीं ऋद्धिसिद्धी नांदतात अशी श्रद्धा आहे.

नवरात्रांत ज्या ज्या घरीं घटस्थापना होते त्या घरीं भाविक नऊ दिवसांतून एकदां तरी हा "गोंधळ" घरीं करवतात.

**शुभमंगल नवरात्री वाजती सुस्वर वाद्यें हो।**
**मांडिती नवपल्लव घट सनक सन्मुनिवृंदें हो।**
**घालिती गोंधळ गोंधळी**
**सहस्रवदनादिक बोलके हो॥**

असें हें "गोंधळ" या वाङ्मयाचें नवरात्रांत माहात्म्य आहे.

नवरात्रांत अंबादेवीच्या देवालयांत षष्ठीच्या दिवशीं हा "गोंधळ" समारंभ घडवून आणतात. भक्तिरसयुक्त गायन-वादनानें सर्व सभामंडप निनादून उठतो. गोंधळीजनांचें वादन म्हणजे ढोलक्यासारखें संबळ नांवाचें एक वाद्य आणि

एकतारीसारखें चोंडक हें एक वाद्य हीं होत. हीं वाद्यें गोंधळी साथीला घेऊन आपल्या गोंधळांत रंगून जातो, गातो, नाचतो आणि भक्तिभावानें तल्लीन होतो.

अंबाबाईचा “ जोगवा ” हि प्रसिद्ध आहे.

**“ जोगवा जोगवा अंबाबाईच्या पोताचा । ”**

रात्रभर जागरण करून अंबादेवीला प्रसन्न करण्यासाठी गोंधळी अंबाबाईच्या पोतासाठी तेलाचा जोगवा मागतात.

आई अंबाबाईच्या नांवानें मागितली जाणारी भिक्षा देणाऱ्याला व घेणाऱ्याला फलप्रद असते. कारण तो जोगवा मंगलप्रद, अभयदायी आणि उन्नतिकारक असतो असा आस्तिक मंडळींचा दृढविश्वास आहे.

**अंबादेवी - यात्रा :**

आषाढी एकादशीला पंढरपूरची यात्रा भरते. पण त्या आधीं कित्येक दिवस त्या यात्रेच्या तयारीला लागतात. वारकरी मंडळीच्या आणि यात्रेकरूंच्या उत्साहाला उधाण आलेलें असतें. जें महत्त्व पंढरपुरीं विठोबा - रुखमाईच्या यात्रेचें तेंच महत्त्व नवरात्रीला अमरावतीवासिनी अंबादेवीच्या यात्रेचें आहे.

आश्विन शुद्धपक्षाच्या प्रतिपदेला नवरात्राचा प्रारंभ होऊन घटस्थापना होते. त्या आधीं पंधरा दिवसांपासून यात्रेच्या तयारीला सुरुवात होते. एखादा लग्नसमारंभ असतांना लग्नघरीं जी गडबड धांदल उडते तीच घाईगर्दी, तारांबळ येथील अंबादेवीच्या देवळांतील विश्वस्त मंडळी आणि पूजारी यांची होत असते. परगांवची मंडळीहि या नवरात्राची

मोठ्या आतुरतेनें वाट पहात असतात. केव्हां नवरात्र येतें आणि आपण यात्रेंत सामील होतों असें त्यांना होऊन जातें.
विदर्भांतच नव्हे, तर साऱ्या महाराष्ट्रांत अंबादेवीच्या यात्रेचें फार मोठें आकर्षण आहे.

नवरात्र सुरू होण्यापूर्वी कीर्तनकारांचे दिवस निश्चित होतात. गोंधळी आपला दिवस निश्चित करतात. पुरोहित मंडळी आपली सप्तशती व देवीच्या पाठाला बसण्याची जागा ठरवून जातात.

यात्रिकांना देवीच्या दर्शनाची ओढ तर असतेच, परंतु देवालयाच्या आसमंतांतील प्रदेशांत भरलेल्या यात्रेच्या मनोवेधक दृश्यांत कांहींना अधिक आकर्षण वाटतें. देवीचें दर्शन होतांच यात्रेच्या मेळाव्यांत तो यात्रिक रमून जातो.

बहुजनसमाजाला अजूनहि यात्रेचें महत्त्व अधिक वाटतें. यात्रेंतील अणुरेणु अंबादेवीच्या कृपापरिमलाने वेष्टिलेला असतो अशी ह्या भाविकांची श्रद्धा असते. यात्रेला जाऊन देवीच्या दर्शनाचें पुण्य जोडण्याची संधि आणण्यासाठीं ते कित्येक दिवस योजना आंखीत असतात. नवरात्री यात्रेला येऊन आपल्या इच्छा आकांक्षा सफलित झालेल्या पाहून मोठ्या मन:शांतीचा लाभ घेत आपापल्या खेड्यांना ते परततात. दोन-तीन दिवसांच्या मुक्कामाच्या तयारीनेंच हे यात्रेकरू येथें आलेले असतात.

वडीलधाऱ्या मंडळींना देवीच्या दर्शनाची ओढ असते, तर बालगोपालांना नाना वस्तू खरीदण्याची घाई झालेली असते. नवरात्रांत बालगोपालांना व आपल्या पत्नीला हवी ती वस्तू घेता यावी यासाठीं आसपासच्या खेड्यापाड्यांतील मंडळी कितीतरी दिवस आधींपासून पैसा जोडीत असतात.

अंबादेवीच्या दर्शनाची तर अहमहमिका सुरू असते. पहारेकऱ्यांच्या देखरेखीमुळें नऊ दिवसपर्यन्त यात्रेकरूंना नवरात्रीचा सोहळा व्यवस्थित व शांतपणें पहातां येतो.

अमरावती शहरांतील सकाळ, दुपार, संध्याकाळ, नव्हे रात्रहि हजारों दर्शनेच्छु स्त्रीपुरुषांनीं फुललेली असते. ह्या देवीचें दर्शन घेतल्याशिवाय पाणीहि न पिण्याचा व्रतसंकल्प करणारे भाविकजनहि ह्या नवरात्रांत कितीतरी असतील.

नवरात्रांतील नऊ दिवस अंबादेवीच्या वैभवाला कसली उणीव असणार आहे ! अंबादेवी नखशिखान्त सुवर्णालंकारांनीं भूषविली जाते. भक्तजन भरजरी पीतांबराच्या घड्यावर घड्या ह्या नवरात्रांत देवीला आर्पण करीत असतात. ह्या निमित्तानें कांहीं श्रीमंत भक्त कृतसंकल्प म्हणून एखादा मौल्यवान् अलंकार अंबादेवीला भक्तिभावानें अर्पण करून नवसाची सांगता करतात. अर्थात् ह्या साऱ्या गोष्टी विश्वस्तांच्या संमतीनें व त्यांच्या लक्षांत आणून देऊन होत असतात. कारण ह्या पवित्र परिसरांत कोणत्याहि व केव्हांहि असत्य मूल्यांचा शिरकाव होऊं नये असा विश्वस्तांचा कटाक्ष असतो व त्याची यथायोग्य अंमलबजावणी होते आहे हेंहि तेच पहात असतात. पूजारी मंडळींची धांवपळ तर विचारायलाच नको. सारें कांहीं यथासांग निर्विघ्नपणें पार पाडण्यासाठीं ते अहोरात्र खपत असतात.

आणि आश्विन शुद्धपक्षी प्रतीपदेला सुमुहूर्तावर अंबादेवीच्या समोर घटस्थापना होते. या घटस्थापनेची यथासांग पद्धति लक्षांत घेतल्यास ह्या मागें संस्कृतिसंवर्धनाची व

भारताच्या चिन्मय मूल्यांचीं बीजें पेरलीं गेलीं आहेत हें पहाणें मोठें आनंददायी होणार आहे.

घटस्थापनेच्या दिवशीं सकाळीं बांबूच्या परडीवर काळी माती पसरतात. त्यावर लहानशी कोरी घागर ठेवतात. मातीवर गहूं किंवा जवस पेरतात. कुंभाच्या गळ्याला सूत गुंडाळतात. कुंभांत पंचामृत टाकतात. कुंभाच्या तोंडावर विड्याचीं पांच पानें ठेवतात. कुंभावर फुलें, बांगड्या, मंगळसूत्र ठेवून पूजा करतात. गळ्यांत फुलांची माळ घालतात. मंगळसूत्र बांधतात, विडा ठेवतात, विड्यावर ५ केळीं, ५ लिंबें, ५ खारका, ५ सुपाऱ्या, ५ बदाम, जायफळ, जायपत्री, लवंग, वेलदोडे हें विड्याचें सामान ठेवतात. फुलवातीचा दीप ओवाळतात. उदबत्ती लावतात. पाणी सोडून प्रार्थना करतात.

"हे जगदंबे ! माझ्या पूजेचा स्वीकार कर. मला आशीर्वाद दे" नऊ दिवसपर्यन्त नंदादीप अखंड तेवत असतो. ह्या नंदादीपाच्या रूपानें जणुं भाविकांच्या श्रद्धेची ज्योतच अखंड तेवते आहे असा भास होतो.

रात्रीं हरिकथा, जागरण, गोंधळ इत्यादि कार्यक्रम चालू असतात.

ह्या दिवसांत दानधर्माला उधान आलेलें असतें; कारण "कवडी एक देतां। देसी हार मुक्ताफळा हो" ही प्रापंचिकांची निष्ठा असते.

प्रतीपदेपासून अष्टमीपर्यन्त सप्तशती व वेदपाठ चालू असतो. आणि देवीसहित सारे उपासक उपवास करीत 'सप्तशती'च्या पाठांचें पारायण चालू ठेवतात. नवमीच्या दिवशीं सप्तशतीचें व देवीचें पारायण संपतें. होमहवनानें त्या दिवशीं देवीला संतुष्ट करतात. ह्या नवमीला–

**प्रचंड बळि होमानाळीं पडती ।**
**चंडमुड बापुडे हो ॥**

चंडमुंडादिक असुरांप्रमाणें दुष्ट वृत्तींचा होम ह्या यज्ञ-स्थळीं होत असतो; ह्या सद्भावनेनें ह्या नवमीच्या होमाला यात्रेकरूंची रीघ लागलेली असते. ते सारे यात्रेकरू श्रद्धाभावानें होमांत नारळ टाकून आपल्या मनांतील असत् विचारांची जणुं आहुति देऊन सद्भावना प्रकट करीत असतात.

ह्या दिवशीं उपवासाचें पारणें होतें. अंबाबाईचा जोगवा मागितला जातो. पुरणाच्या पोळीच्या नैवेद्यानें नवरात्राचें पारणें होतें आणि नवरात्राची सांगता होते. दहावे दिवशीं असुरांच्या असुरवृत्तींचा संहार करणारी ही विजया जगदंबा, अंबादेवी सीमोल्लंघनास निघते.

या दहा दिवसपर्यन्त यात्रेचें स्वरूप प्रतिपत्चंद्ररेखे-प्रमाणें वर्धमान स्थितींत असतां यात्रेकरूंचा मेळावा अधिकाधिक वाढतें रूप घेऊं लागतो. अष्टमी आणि नवमीला विशेष गर्दी असते. नवससायास फेडण्याचे निमित्तानें, होम पाहण्याच्या निमित्तानें हजारों यात्रेकरू ह्या दोन दिवसांत येतात. यात्रेला विराट स्वरूप प्राप्त होतें.

अंबादेवीच्या देवळांत खणानारळांचे ढीगचे ढीग पडतात. अंबादेवीचा तेजस्वी मुखवटा आणि गाभाऱ्यांतील परिसर हळदकुंकवाच्या सडचानें एक आगळीच शोभा प्रकट करीत असतो.

असा हा नवरात्राचा थाट आहे. काळ बदलतो आहे. काळाबरोबर अंधश्रद्धा लोप पावत असल्या तरी पण चिरंतन मूल्यांचा परिपोष करणारी ही संस्कृतिसंवर्धिनी नवरात्रघटिका उजळतें रूप, नवें रूप धारण करते आहे. ह्या नवरात्राचें, ह्या

अंबादेवीचें आकर्षण नित्य नव्या स्वरूपाचें, नवनवोन्मेषकारी वाटतें हें मात्र खरें.

**महालक्ष्मी अंबादेवी :**

नवरात्रीचा हा सोहळा होतो. अंबादेवीचा रोजचा खर्च आणि यात्रेच्या सुमारास होणारा खर्च याचा विचार करायला सामान्य मति पंगु ठरते. अंबादेवी ही महालक्ष्मीरूप आहे. तिला कसली उणीव ! पण ही देवता सामान्य मानवाकडून पूजिली जाते. हिची व्यवस्था आणि हिच्या नवरात्रीं होणारा खर्च ह्याला आवक कुठली ? इतकी संपत्ति देवीजवळ कुठली ? हा व्यवहारी प्रश्न साहजिकच उद्‌भवतो.

इ. स. १९०१ पर्यंत अंबादेवीच्या पैशाचा आयव्यय रु. ६०००० पर्यंत होता. दिवसेंदिवस तो खर्चहि वाढतो आहे आणि मिळकत, संपत्तिहि वाढते आहे. हें सारें होतें कुठून ?

विश्वस्तांच्या हातीं अंबादेवी संस्थानचा कारभार आहे. ही मंडळी श्रद्धेनें आणि निष्ठेनें येथील सर्व जबाबदारी संभाळतात.

अंबादेवीला अन्नसत्र अखंड चालू असते. कोणताहि यात्रिक येथें आला तर, विश्वस्तांच्या परवानगीने तो तीन दिवसपर्यन्त देवालयाच्या निवासस्थानीं राहूं शकतो. तेथेंच त्याच्या भोजनाची व्यवस्था होते.

हें अखंड अन्नसत्र आणि दररोज एका मेहुणाला पुरण-पोळीचें जेवण आणि नित्य धार्मिक सणावाराला गोडधोड ही येथील पद्धति. ह्या साऱ्या खर्चांच्या बाबींचा विचार केल्यास आणि येथील नोकरवर्ग, पूजारी, देवालयाची व्यवस्था पाहणारी मंडळी यांच्या वेतनाचा, योगक्षेमाचा विचार केल्य

अंबादेवीला हा खर्च चालवणें कसें शक्य होतें हें क्षणभर कोडें पडणें स्वाभाविक आहे.

अंबादेवीच्या नांवें शेती, जमीनजुमला, वाडे, इमारती इ. भूमिभाग आहे. हें सर्व भक्तांचें दान आहे. दोनतीनशें वर्षांपासूनचा इतिहास जरी लक्षांत घेतला तरी असा उल्लेख आढळतो कीं अनेक विलासी वैभवसंपन्न धनिक अंबादेवीच्या दर्शनानें सत्प्रवृत्त होत. पापाचें क्षालन करण्यासाठीं अंबादेवीच्या नांवें मृत्युपत्र लिहून ठेवीत व मनःशान्तीचा लाभ होतांच चिरनिद्रा अनुभवीत.

तरीहि अंबादेवीच्या अफाट खर्चाच्या मानानें हें दान, ही मिळकत कमीच म्हणायची. आणि इथें आणखी एका सामाजिक चालीरीतीवर प्रकाश पडतो.

महालक्ष्मी, महासरस्वती आणि महाकाली याचें एकरूप म्हणजे महामाया आदिशक्ति असें मानलें तर, ही आदिशक्ति, नटेश्वर शिवाची शक्ति विविध कलांची स्वामिनी आहे हें लक्षांत येतें. अंबादेवी ही कलांची भोक्ती आहे. ह्या रसिकवृत्ति अंबादेवीला सध्यां संकीर्तनादि प्रकारानें रिझविलें जातें. पण विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यन्त ह्या ठिकाणीं अंबेच्या पूजेला कलावंतिणी येत. संगीतादि साधनांनी त्या अंबादेवीला प्रसन्न करीत. अमरावती हें एके काळीं कलावंतिणींचें माहेरघर होतें. देवीसमोर हजेरी देण्याचा त्यांचा रिवाज होता.

अमरावती शहर मागें वर्णिल्याप्रमाणं धनसंपदेचें आगर होतें. ह्या कलावंतिणींना धनवानांचा आश्रय होता. ह्या कलावंतिणी अत्यंत धनवती असत. अलंकारानें नटूनथटून त्या देवीपुढें हजेरी द्यायला येत.

अंबादेवी त्यांच्या कलेचा आस्वाद घेई, पण त्या परतांना त्यांच्या मनांत परिवर्तन घडवून आणी. वर्षानुवर्ष पातकें करून मिळविलेली संपत्ति त्या पातकांचें क्षालन होण्याकरितां मृत्युपूर्वीं त्या अंबादेवीला दान करीत.

असें कित्येक वर्षें चाललें होतें. अनेक कलावंतिणींनीं आपली सर्व मालमत्ता अंबेच्या पदकमलीं अर्पण केली आहे.

आज अंबादेवी अत्यंत सधन आहे. आणि ही विपुलता दानधर्मानें प्रकट होत आहे, अन्नसत्राच्या रूपांत मूर्त रूप घेते आहे.

अशी आहे अमरावतीवासिनी अंबादेवी. हिचें यथातथ्य वर्णन करतांना अनेक सद्भक्तांची वाणी शिणली. त्यांनीं आपापल्या सामर्थ्याप्रमाणें अंबादेवीला पूजा वाहिली. ते पावन झाले.

आज माझ्या अल्पशक्तीमुळें मी ह्या जगन्निवासिनी, अमरावतीवासिनी अंबादेवीला सुगंधित, सुमनोहर वर्णनपुष्प वाहूं शकलें नसेन, पण त्या पुष्पाची एक पाकळी अर्पण करण्याचें सामर्थ्य ह्या अंबादेवीनें दिलें म्हणूनच हें शक्य झालें. मला खात्री आहे, कीं ह्या चिन्मयरूप अंबादेवीच्या कृपाप्रसादानें वाग्देवतेच्या चरणीं मनोहारी उमलतें वर्णनपुष्प सादर करण्याचें सामर्थ्य मलाहि येईल.

आज अंबादेवीजवळ, अमरावतीवासिनी रेणुकेजवळ मागणें एवढेंच--

" न्यून तें पुरतें " करून घे.

उदयोऽस्तु अंबे ! उदयोऽस्तु अंबे !

* * *

## कृतज्ञता

अंबादेवीबद्दल माहिती लिहून पाठवावी, ती साधार असावी, अशी प्रकाशकांची सूचना आली. अंबादेवी सर्वांत प्राचीन; परन्तु ह्या संस्थानासंबंधीं माहिती फार थोडी. मोठा प्रश्न पडला !

पण मी येथील सन्मान्य माहितगार व्यक्तींकडे धाव घेतली. त्या सर्वांनीं मला मोठ्या आपुलकीनें जेवढें शक्य होतें तेवढें साहाय्य केलें. त्याबद्दल मी त्यांचे आभार न मानल्यास कृतघ्न ठरेन. त्या व्यक्ति म्हणजे मान्यवर श्री. अण्णासाहेब खापर्डे, श्री. हरिहरराव देशपांडे आणि श्री. आर. डी. देशपांडे. ह्या सर्वांचें मला नेहमींचें सहकार्य असतें. तें पुनः एकवार या निमित्तानें दिलें गेलें. त्यांची मी अत्यंत आभारी आहें. लेखनाच्या मागें प्रसादरूपानें व स्फूर्तिरूपानें माझे दिवंगत पतिराज उभे होते, त्याची परतफेड मी कशी आणि कोणत्या शब्दानें करूं ?—**शकुन्तला**


**सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन : संच १ ला**

**संच रु. ३–६०; प्र. पुस्तक ६० न. पैसे**

१. **सुंदर तें ध्यान** : पंढरपूर
२. **जय जय रघुवीर समर्थ** : सज्जनगड
३. **ज्ञानोबा माउली** : आळंदी
४. **एका जनार्दनी** : पैठण
५. **मल्हारी मार्तंड** : जेजुरी
६. **तुका झालासे कळस** : देहू

**सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन : संच २ रा**

**संच रु. ३–७२; प्र. पुस्तक ६२ न. पैसे**

१. **श्रीगोदे, भवताप हरी** : त्र्यंबकेश्वर - नाशिक
२. **मंगलमूर्ति मोरया** : चिंचवड
३. **जय जगदंब** : कोल्हापूर
४. **श्रीगुरुदेव दत्त** : नरसोबाची वाडी औदुंबर
५. **जय भवानी !** : तुळजापूर
६. **माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिके** : नेवासें

**सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन : संच ३ रा**

**संच रु. ३–७२; प्र. पुस्तक ६२ न. पैसे**

१. **गोमंतकाची शान्ति - शक्ति** : कवळें
२. **पार्वतीपते ! हर हर महादेव** : श्रीमंगेश
३. **'डाकिन्याम् भीमशंकरम्'** : भीमाशंकर
४. **दलितांचा कैवारी भार्गवराम** : परशुराम
५. **छत्रपतींचें कुलदैवत** : शिखर शिंगणापूर
६. **श्रीगुरूंचें गंधर्वपूर** : गाणगापूर


११३८९

REFBK-0011396

REFBK-0011396



वोरा अँण्ड कंपनी पब्लि.प्रा.लि.
मुंबई.